क्रमांक:१६०६०/क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
दिनांक: २१ ऑक्टोबर, २०२१.

**संदर्भ- या सचिवालयाचे परिपत्रक क्रमांक ३१०३०/क-१, दिनांक ४ डिसेंबर, २०१८.**

**:: परिपत्रक ::**

या सचिवालयातील उप सचिव व त्यावरील दर्जाच्या अधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानमंडळाच्या समित्यांचे मुंबईबाहेर तसेच राज्याबाहेर अभ्यास दौरे आयोजित करण्यात येतात. सदरहू दौऱ्याच्या वेळी समितीस सहाय्य करण्यासाठी कक्षातर्फे त्या-त्या कक्षातील कर्मचारी, कक्ष अधिकारी, अवर सचिव (समिती), अवर सचिव, उप सचिव व त्यावरील दर्जाचे अधिकारी सहभागी होत असतात. उप सचिव व त्यावरील दर्जाचे अधिकारी यांच्याकडे या सचिवालयातील समिती कक्षांचे त्याचप्रमाणे सभागृहाशी संबंधित कक्षांचे कामकाज सोपविण्यात आलेले आहे. उप सचिव दर्जाचे अधिकारी त्यांच्या अधिनस्त असलेल्या कक्षांच्या कामकाजावर नियंत्रण अधिकारी म्हणून कार्यरत असल्यामुळे असे अधिकारी समिती समवेत मुंबईबाहेरील दौऱ्यावर गेल्यास त्यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या अन्य कक्षांच्या कामकाजावर परिणाम होतो. त्यामुळे संबंधित कक्षांचे कामकाज प्रलंबित राहते व तातडीची प्रकरणे निर्णयाअभावी निकाली काढण्यात अडचणी निर्माण होतात. त्याचप्रमाणे उप सचिव व त्यावरील दर्जाचे अधिकारी मा. पीठासीन अधिकारी /प्रधान सचिव यांना चर्चेस उपलब्ध होत नाहीत. शासकीय कार्यालयीन कामकाजाच्या प्रक्रियेमध्ये उप सचिव व त्यावरील अधिकारी हे निर्णय प्रक्रियेतील महत्वाचा घटक आहेत. त्यामुळे या अधिकाऱ्यांचा निर्णय प्रक्रियेत सहभाग आवश्यक असल्याने त्यांची मुख्यालयाच्या ठिकाणी उपस्थिती ग़रजेची आहे.

कार्यालयीन कामकाजाच्यादृष्टीने या सचिवालयातील उप सचिव व त्यावरील दर्जाच्या अधिकाऱ्यांनी विधानमंडळ समित्यांचे मुंबई बाहेरील अभ्यास दौरे करु नयेत असा निर्णय मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचा समावेश असलेल्या मा.मंडळाने माहे डिसेंबर, २०१८ मध्ये घेतलेला आहे. यासंदर्भात संदर्भाधीन परिपत्रकान्वये उप सचिव व त्यावरील दर्जाच्या अधिकाऱ्यांना कळविण्यात आले आहे.

..२/-